# राज्य माहिती आयोग, मुख्यालय, मुंबई

माहितीचा अधिकार

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

## क्र.मुमाआ/नों.क्र.५२७९ ते ५२८५, ५२९२ ते ५२९५ / २२ / अ.क्र.२६५६ ते २६६७ /२६

श्री. हेमंत भरत कालिया
१०७, १ला माळा, लक्ष्मी बिल्डिंग नं.७,
संभाजीनगर, साहार रोड, अंधेरी (पूर्व), मुंबई-४०००६९.

विरुद्ध

जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (पजवा) के/पूर्व विभाग,
बृहन्मुंबई महानगरपालिका, उप प्रमुख अभियंता, (पर्जन्य जलवाहिन्या)
पश्चिम उपनगरे यांचे कार्यालय, ग्रीन वुड्स को.हौ.सो. अंधेरी-कुर्ला रोड,
चकाला, अंधेरी(पू.), मुंबई-४०००९३.

प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (पजवा) प.उ. (परि-३),
बृहन्मुंबई महानगरपालिका, उप प्रमुख अभियंता, (पर्जन्य जलवाहिन्या)
पश्चिम उपनगरे यांचे कार्यालय, ग्रीन वुड्स कॉ.हौ.सो. अंधेरी-कुर्ला रोड,
चकाला, अंधेरी(पू.), मुंबई-४०००९३.

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : २३.०३.२०२६**

अपीलकर्ता : उपस्थित
विद्यमान जन माहिती अधिकारी : अनुपस्थित
प्रथम अपीलीय अधिकारी : अनुपस्थित

**अपील क्रमांक २६६६** :- यात अपिलार्थीना माहिती प्राप्त झाली असल्याचे आढळून येते. तथापि, अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकाऱ्यांनी यासदर्भात संयुक्तपणे उपरोक्त अपील अर्ज निकाली काढावा अशी विनंती केलेली असून त्याप्रमाणे उक्त अपिल अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

उर्वरित सर्व अर्जामध्ये अपिलार्थीनी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सहाय्यक अभियंता पजवा के/पूर्व विभाग, आर/दक्षिण विभाग, पूर्व विभाग, सहाय्यक अभियंता रस्ते एच/पश्चिम, एच/पूर्व व पी/उत्तर येथील विविध **जोडपत्र अ** द्वारे झालेल्या विकास कामासंदर्भात संपूर्ण माहिती मागितली असून वरील माहिती प्रदान करण्याआधी अवलोकन देण्याविषयी देखील विनंती केलेली आहे.

वरील सर्वच प्रकरणात तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी मागितलेली माहिती ही व्यापक स्वरूपाची असून माहितीचा अधिकार अधिनियम सुधारणा, २०१२ यातील **कलम ३ (क)** नुसार एकापेक्षा अधिक विषयाशी संबंधित असल्याचा प्रतिसाद दिलेला आहे.

या उलट तत्कालीन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थींना माहितीचे अवलोकन देऊन चिन्हांकित केलेली माहिती सशुल्क देण्याचे निर्देश दिले असल्याचे आढळून येते.

प्रस्तुत प्रकरणी मागितलेल्या माहितीचा कालावधी हा साधारण मार्च, २०२० ते अर्ज दाखल करण्याच्या दिनांकापर्यंत सन २०२१-२०२२ या कालावधीतील असून उपरोक्त माहिती ही सार्वजनिक विकास कामाशी तसेच प्राधिकरणाद्वारे केलेल्या विनियोगाशी संबंधित असून उपरोक्त माहिती **कलम ४ (१), ११** प्रमाणे स्वयंप्रेरणेने उघड करणे अपेक्षित असून माननीय सर्वोच्च न्यायालय यांनी त्यांच्या **किशनचंद जैन विरुद्ध युनियन ऑफ इंडिया wp civil 990 of 2021** यात दिलेल्या निर्देशाप्रमाणे सर्वच प्राधिकरणांनी या संदर्भातील माहिती स्वतःच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्याविषयी निर्देश दिलेले आहेत.

माननीय सर्वोच्च न्यायालय यांच्या उपरोक्त निर्देशाच्या अनुषंगाने तसेच मागितलेल्या माहितीची व्याप्ती लक्षात घेता यातील सर्व माहिती ही बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या वरील सर्व प्राधिकरणांनी त्यांच्या संकेतस्थळावर **कलम ४ (१) (ख) विशेषत: यातील उपकलम ११, ४ (१) (ग), ४ (२), ४ (३) व ४ (४)** यातील तरतुदीनुसार आपल्या संकेतस्थळावर विनामूल्य उपलब्ध करून देण्याच्या निर्देशासह यातील जी माहिती सॉफ्ट कॉपी स्वरूपात उपलब्ध आहे ती अपिलार्थीच्या मोबाईल/ईमेल यावर पीडीएफ स्वरूपात विनामूल्य प्रदान करण्याच्या निर्देशासह व यातील जी माहिती सॉफ्ट कॉपी स्वरूपात उपलब्ध नाही अशी दीडशे पृष्ठांपर्यंतची माहिती अपिलार्थींना विनामूल्य देण्याच्या निर्देशासह वरील सर्व अपील अर्ज निकाली काढून नस्तीबद्ध करण्यात येत आहेत.

**आदेश**

**१. वरील विवेचनानुसार जन माहिती अधिकारी यांनी कार्यवाही करावी.**
**२. अपिल निकाली काढण्यात येत आहेत.**

**मुंबई**
**दिनांक : २३-०३-२०२६**

**( राहुल भा. पांडे )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

State Information Commission ★ Maharashtra ★

Jyotsna